# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** सुदर्शन कॉलनी, लक्ष्मीनगर येथे नागपूर महानगरपालिकेचे जुने
**{सा.बां.वि. झोन क्र. ०१}** सार्वजनिक शौचालय सध्या उपयोगात नसुन त्याठिकाणी असामाजिक तत्वांचा वावर असल्याबाबत तक्रारीत नमुद आहे. सदर शौचालय पाडण्याबाबत सुदर्शन कॉलनी, लक्ष्मीनगर येथील नागरिकांच्या मागणीनुसार मा. आमदार श्री. संदिपजी जोशी (वि.प.स.) यांचे निवेदन पत्र प्राप्त झालेले आहे. सदर शौचालय अतिशय शिकस्त असल्यामुळे सुदर्शन कॉलनी, लक्ष्मीनगर प्रभाग क्र. १६ येथील सार्वजनिक शौचालय तोडण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 26 **/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 24 /06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभाग, लक्ष्मीनगर झोन क्र. ०१ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सुदर्शन कॉलनी, लक्ष्मीनगर येथे नागपूर महानगरपालिकेचे जुने सार्वजनिक शौचालय सध्या उपयोगात नसुन त्याठिकाणी असामाजिक तत्वांचा वावर असल्याबाबत तक्रारीत नमुद आहे. सदर शौचालय पाडण्याबाबत सुदर्शन कॉलनी, लक्ष्मीनगर येथील नागरिकांच्या मागणीनुसार मा. आमदार श्री. संदिपजी जोशी (वि.प.स.) यांचे निवेदन पत्र प्राप्त झालेले आहे. सदर शौचालय अतिशय शिकस्त असल्यामुळे सुदर्शन कॉलनी, लक्ष्मीनगर प्रभाग क्र. १६ येथील सार्वजनिक शौचालय तोडण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.